**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका-२०१७**
नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाच्या शपथपत्रामध्ये सुधारणा करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
क्रमांक- रानिआ/मनपा-२०१५/ प्र.क्र. २४/का.५
दिनांक : १९ जानेवारी, २०१७

## आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का.५ ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी; मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र. ७१७८/२००१ दि.२ मे, २००२ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार आयोगाच्या दि. १५ मार्च, २००४ च्या आदेशान्वये नामनिर्देशन पत्रासोबत शपथपत्र सादर करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यात वेळोवेळी दि. ७ जुलै, २००८ रोजी व दि. ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी सुधारणा करण्यात आली आहे.

३. आणि ज्याअर्थी; मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील निकालातील काही मुख्य बाबी खालीलप्रमाणे आहेत :-

"Under our Constitution, Article 19(1) (a) provides for freedom of speech and expression. Voter's speech or expression in case of election would include casting of votes, that is to say, **voter speaks out or expresses by casting vote.** For this purpose, information about the candidate to be selected is must. Voter's (little man-citizen's) right to know

antecedents including criminal past of his candidate contesting election for MP or MLA is much more fundamental and basic for survival of democracy, **The little man may think over before making his choice of electing law breakers as law makers.**"

"The Election Commission is directed to call for information on affidavit by issuing necessary order in exercise of its power under Article 324 of the Constitution of India from each candidate seeking election to Parliament or State Legislature as a necessary part of his nomination paper, furnishing therein, information on the following aspects in relation to his / her candidature :-

1. Whether the candidate is convicted / acquitted / discharged of any criminal offence in the past- if any, whether he is punished with imprisonment or fine?
2. Prior to six months of filing of nomination, whether the candidate is accused in any pending case, of any offence punishable with imprisonment for two years or more, and in which charge is framed or cognizance is taken by the Court of law. If so, the details thereof.
3. The assets (immovable, movable, bank balances etc.) of a candidate and of his/ her spouse and that of dependants.
4. Liabilities, if any, particularly whether there are any over dues of any public financial institution or Government deues.
5. The educational qualifications of the candidate."

"It is to be stated that the Election Commission has from time to time issued instructions / orders to meet with the situation where the field is unoccupied by the legislation Hence, the norms and modalities to carry out and give effect to the aforesaid directions should be drawn up properly by the Election Commission as early as possible and in any case within two months."

४. त्याअर्थी; मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील वरील बाबी लक्षात घेता ५ ऑक्टोबर, २०१५ द्वारे निश्चित करण्यात आलेल्या शपथपत्रामध्ये काही सुधारणा करणे

आवश्यक झालेले आहे. म्हणून राज्य निवडणू आयोग, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका, १८८८ च्या कलम १८ए(४) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४) अन्वये मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करुन उपरोक्त दि. ५ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशात सोबत विहित केलेल्या अनुसूची-२ (१०) (iii) नंतर पुढील मजकूर समाविष्ठ करण्याबाबत आदेश देत आहे:-

"१० (iv) वरील शपथपत्रामध्ये सादर केलेल्या तपशीलाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

**(उमेदवारांनी दाखल केलेल्या उपरोक्त शपथपत्रामधील माहितीचा गोषवारा)**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | वय | |
| २ | शिक्षण | |
| ३ | व्यवसाय | |
| ४ | अपत्यांची संख्या | |
| ५ | दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांची संख्या. | |
| ६ | ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे अशा प्रकरणांची संख्या. | |
| ७ | उमेदवाराचा पॅन क्रमांक | |
| ८ | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | |
| ९ | कुटुंबाच्या जंगम मालमत्तेचा तपशील | |
| १० | कुटुंबाच्या स्थावर मालमत्तेचा तपशील | |
| ११ | एकूण मालमत्ता (अ.क्र. ९+१०) | |
| १२ | मी देय असलेल्या सार्वजनिक वित्तीय संस्था यांच्याकडील व शासकीय / निमशासकीय संस्थांकडील दायित्वे / थकीत रकमा यांचा तपशील | |

१० (v) मागील निवडणुकीमध्ये सादर केलेल्या शपथपत्रातील माझी स्थावर व जंगम मालमत्ता तसेच दायित्वे / थकीत रकमा यांच्या तपशीलाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :- **(उमेदवाराने यापूर्वी मागील निवडणूक लढविली असल्यास, त्या निवडणुकीच्यावेळी सादर केलेल्या माहितीचा गोषवारा)**

| अ. क्र. | मागील लढविलेल्या निवडणुकीचे नाव | निवडणुकीचे वर्ष | एकूण जाहीर केलेली स्थावर व जंगम मालमत्तेचे मूल्य | दायित्वे / थकीत रकमा यांच्या तपशीलाचा गोषवारा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

"

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व महानगरपालिका आयुक्त.
३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
४) मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
५) सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
६) निवड नस्ती.